जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३१६ दिनांक - ११/०८/२०२४

गुन्हे शाखा, युनिट ६,पुणे शहर

# कोलवडी येथे घरफोडी चोरी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

दि.१०/०८/२०२४ रोजी गुन्हे शाखा, युनिट ६ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार हे युनिट ६ च्या हद्दीमध्ये गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना **पोलीस नाईक नितीन मुंढे** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नामे महेश चव्हाण हा आव्हाळवाडी गावचे हददीत निळकंठेश्वर मंदिराजवळ, मोकळया मैदानात, आव्हाळवाडी येथे थांबलेला आहे खाञीशीर बातमी मिळाली.

सदर माहिती सदरची बातमी वरीष्ठांना कळवली असता त्यांनी बातमीप्रमाणे जावून खातरजमा करून कारवाई करण्याचे आदेशित केल्याने सदर बातमीप्रमाणे जावुन खात्री केली असता सदर ठिकाणी महेश चव्हाण हा संशयीतरीत्या थांबलेला दिसला. त्यास शिताफीने ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **महेश ऊर्फ महया काशिनाथ चव्हाण वय १९ वर्षे रा. कॅनॉलजवळ, तुळजाभवानी वसाहत, गाडीतळ, हडपसर, पुणे** असे असल्याचे सांगितले. त्याचे अंगझडती दरम्यान तो त्याचे खिशात सोन्याचे दागिने मिळून आले. त्याबाबत त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने त्याचे इतर साथिदारांसह कोलवडी व कोंढवा परिसरात घरफोडी चोरी केल्याचे सांगून सदरचे सोन्याचे दागिने हे त्यातीलच असल्याचे कबूल केले आहे. सदरबाबत अभिलेख तपासले असता वर नमूद आरोपीकडून खालीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

१) लोणीकंद पोलीस स्टेशन गु र नं- ७१३/२०२४ भा न्या सं कलम ३०५(अ), ३३१(४)
२) कोंढवा पोलीस स्टेशन गु र नं- ९५५/२०२४ भा न्या सं कलम ३०५, ३३१(४)

नमूद आरोपीकडून दोन्ही गुन्हयातील ३४.५ ग्रॅम सोन्याचे दागिने असा एकूण २,४५,०००/- रु किं चा मुददेमाल गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आला आहे. आरोपी **महेश ऊर्फ महया काशिनाथ चव्हाण** हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी वानवडी, चंदननगर, हडपसर, भारती विदयापीठ या पोलीस ठाण्यांमध्ये घरफोडी व वाहनचोरी सारखे असे एकुण २० गंभीर गुन्हे दाखल आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी,मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ श्री.सतीश गोवेकर, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री.गणेश इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ६ चे पोलीस निरीक्षक श्री.प्रताप पोमण, पोलीस अंमलदार रमेश मेमाणे, कानिफनाथ कारखेले, नितीन मुंढे, ऋषिकेश व्यवहारे, ऋषिकेश ताकवणे, सचिन पवार, शेखर काटे, नितीन धाडगे, समीर पिलाने, बाळासाहेब तनपुरे, गणेश डोंगरे, किर्ती मांदळे, प्रतिक्षा पानसरे व सुहास तांबेकर यांनी केली.